**शासन मान्यता प्राप्त व शासन अनुदानीत किंवा विनाअनुदानीत खाजगी शाळेतील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांविरुध्द लाचलुचपत प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ च्या कलम १९ नुसार अभियोगपूर्व मंजूरी देण्याकरिता " शिक्षण संचालक" यांना यांना प्राधिकार प्रदान करणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: एसीबी २०१५/प्र.क्र९६/टीएनटी ४**
मंत्रालय, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: ५ नोव्हेंबर, २०१५

**संदर्भ**: १) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.अभियो १३१२/प्र.क्र.३०/ पुर्नबांधीत /११ अे/ दिनांक १२/०२/२०१३.
२) महासंचलक ॲन्टीकरप्शन ब्यूरो वरळी,मुंबई यांचे क्र.सीआर ६३७/अमरावती /१४/२०१५/८८१० दिनांक ६ जुलै,२०१५ चे पत्र.

**प्रस्तावना:**

शासकीय कर्मचाऱ्यांविरुध्द लाचलुचपत प्रतिबंध खात्याकडून लाचेच्या यशस्वी सापळ्यामध्ये अभियोग पूर्व मंजूरी देण्यासाठी संबधित नियुक्ती प्राधिकारी सक्षम प्राधिकारी आहेत. शासन मान्यताप्राप्त व शासन अनुदान घेणाऱ्या खाजगी मान्यताप्राप्त शाळांमधील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे विरुध्द दुर्वतन,गैरवर्तन, गैरकारभार, नैतिक अध:पतन झाल्याचे आढळून आल्यास अनुदानित संस्थेच्या कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचे अधिकार महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती ) नियमावली १९८१ मधील नियम २८ ते३९ नुसार " नियुक्ती प्राधिकारी " म्हणून संबधित संस्था/शाळा व्यवस्थापनास आहेत. सदर अनुदानीत संस्थामधील एखादया कर्मचाऱ्यास निलंबित करावयाचे झाल्यास उक्त नियमांतर्गत नियम ३३ नुसार व्यवस्थापनाने संबधित शिक्षणाधिकारी तसेच अध्यापक विद्यालय आणि तंत्र माध्यमिक शाळा यांचे बाबतीत संबधित शिक्षण उपसंचालक यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच लाचलुचपत प्रकरणाबाबतही संबधित संस्थेने कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि लाचलुचपत प्रकरणांमध्ये अभियोग दाखल पूर्व मंजूरी देण्याची कार्यवाही संबधित संस्थांकडून होत नसल्याने परिणाम स्वरुप अशी प्रकरणे ९० दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी प्रलंबित रहात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. अनुदानित खाजगी शैक्षणिक संस्थांतर्गत कार्यरत असलेल्या शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचा-यांच्या (मुख्याध्यापक/उपमुख्याध्यापक/पर्यवेक्षक यांचे सह) संदर्भात लाचलुचपत प्रकरणी अभियोग दाखलपूर्व मंजूरी देण्याकरिता महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती ) अधिनियम १९७७ मधील कलम ४ मधील पोटकलम ४ अ नुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यास शिक्षक संचालक सक्षम असल्याने याबाबत आवश्यक ते प्राधिकार प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

शासन मान्यता प्राप्त व शासन अनुदान घेणाऱ्या खाजगी नोदणीकृत संस्था मार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी (मुख्याध्यापक/उपमुख्याध्यापक/पर्यवेक्षक यांचेसह )यांचे विरुध्द लाचलुचपत प्रकरणी,लाचलुचपत प्रतिबंध कायदा १९८८ च्या कलम अंतर्गत कलम १९ प्रमाणे लागणारी अभियोग पूर्व मंजूरी देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती )

अधिनियम १९७७ मधील कलम ४ मधील पोट कलम ४ अ च्या तरतूदीनुसार नोंदणीकृत खाजगी संस्था मार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानीत शाळांमधील संबधित दोषी कर्मचाऱ्याविरुध्द शिस्तभंग विषयक विहित कार्यवाही नंतर सेवेतून काढून टाकण्यास शिक्षण संचालक हे सक्षम प्राधिकारी असून शिक्षण संचालकांचा निर्णय हा शाळा व्यवस्थापनाला तसेच संबधित कर्मचाऱ्याला बंधनकारक आहे.

२. या तरतूदी विचारात घेऊन प्रकरण परत्वे प्राध्यमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक खाजगी शाळा,अध्यापक विद्यालय आणि तंत्र विद्यालयातील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे बाबतीत, खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांना, शासन मान्य व शासन अनुदान घेत असलेल्या खाजगी शैक्षणिक संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांविरुध्द (मुख्याध्यापक/उपमुख्याध्यापक/ पर्यवेक्षक यांचेसह ) लाचलूचपत प्रकरणी अभियोग दाखल पूर्व मंजूरी देण्यासाठी या आदेशाद्वारे सक्षम प्राधिकारी म्हणून शासन प्राधिकृत करीत आहे. लाचलुचपत प्रतिबंध कार्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यावर संबधित शिक्षण संचालकांनी प्राथमिक चौकशी करुन अभियोगपूर्व मंजूरीची पुढील कार्यवाही विहित मुदतीत म्हणजेच ९० दिवसांचे आत करावी. संबधित शिक्षण संचालकांना, प्राथमिक चौकशीची कार्यवाही करणे शक्य नसल्यास त्यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या लगतच्या कनिष्ठ अधिकाऱ्याकडून कार्यवाही पूर्ण करुन घ्यावी.

| अ.क्र. | संबधित शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी पदनाम | सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|
| १ | प्राथमिक,उच्च प्राथमिक शाळामधील शिक्षक / शिक्षकेतरकर्मचारी(मुख्याध्यापक/उपमुख्याध्यापक / पर्यवेक्षक यांचे सह) | शिक्षण संचालक, ( प्राथमिक ) महाराष्ट्र राज्य पुणे. |
| २ | माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी ( मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक/पर्यवेक्षक यांचे सह) | शिक्षण संचालक,( माध्यमिक व उच्च माध्यमिक ) महाराष्ट्र राज्य पुणे. |
| ३ | अध्यापक विद्यालय आणि तंत्र विद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी ( मुख्याध्यापक / उपमुख्याध्यापक/पर्यवेक्षक यांचे सह) | शिक्षण संचालक,( माध्यमिक व उच्च माध्यमिक ) महाराष्ट्र राज्य पुणे. |

२. लाचलुचतप प्रतिबंध अधिनियम १९८८ अंतर्गत अभियोग दाखल करण्यास मंजूरी देण्यासाठी प्राप्त होणाऱ्या प्रकरणांमध्ये अनुसरावयाच्या कार्यपध्दती बद्दलचे सर्वंकष आदेश तथा सूचना सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन अनुक्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यांचे देखील काटेकोरपणे अनुपालन करण्याची दक्षता सक्षम प्राधिकारी यांनी घ्यावी.

३. हा शासन निर्णय विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५११०५१३०१४७६१२१ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2015.11.05 13:16:51 +05'30'

**( राजेंद्र पवार)**
उप सचिव,महाराष्ट्र शासन

**प्रति,**

(१) आयुक्त, (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे,
(२) महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्यूरो,वरळी,मुंबई
(३) अपर मुख्य सचिव, गृह विभाग,मंत्रालय,मुंबई- ३२
(४) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग मंत्रालय,मुंबई- ३२
(५) सह सचिव( शाखा-अे )विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई- ३२
(६) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे
(७) शिक्षण संचालक,( प्राथमिक ) महाराष्ट्र राज्य पुणे
(८) सर्व विभागीय,शिक्षण उपसंचालक
(९) सर्व जिल्हा शिक्षण अधिकारी(माध्यमिक/प्राथमिक/निरंतर)
(१०) मा.मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
(११) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई